म. सं. कौ. हिं. का. अर्ज क्र.15/2024
**CNRNo.MHBU**170005472024
सिंधु+2 विरुध्द अविनाश+5

## निशाणी क्रमांक.20 वरील आदेश
## (दि.28.04.2026)

01. अर्जदार क्र.1 हिने प्रस्तुत चा अर्ज कलम 23 कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम 2005 प्रमाणे तिच्या स्वतः साठी आणि तिची मुलगी अर्जदार क्र.2 साठी, गैरअर्जदार क्र.1 तिचा पती आणि गैर अर्जदार क्र.2 ते 4 तिचे सासरे, सासु व दीर अनुक्रमे, यांच्या विरुद्ध तिला आणि तिची अज्ञान मुलगी (अर्जदार क्र.2) यांना गैरअर्जदारांकडून अंतरिम पोटगी मिळावी यासाठी दाखल केलेला आहे.

02. गैरअर्जदारांनी अर्जदार हिने निशाणी क्र.19 वर अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये तिने असे नमूद केले आहे की, तिला प्रस्तुत चे प्रकरण त्याच बरोबर निशाणी क्र.20 वरील अर्ज गैरअर्जदार क्र.5 विरुद्ध चालवायचे नाही असे त्यात नमूद केले आहे. त्यामुळे निशाणी क्र.19 व निशाणी क्र.1 वर संयुक्तिक आदेश पारित करून गैरअर्जदार क्र.5 चे नाव प्रकरणातून वगळण्यात आले आहे.

03. गैरअर्जदार क्र.1 ते 4 आणि 6 यांनी निशाणी क्र.14 वर त्यांचे म्हणणे दाखल करुन मूळ अर्जास व या अर्जास आक्षेप नोंदविलेला आहे. त्याच बरोबर गैरअर्जदार क्र.1 ने त्याचे उत्पन्न आणि खर्चाचे विवरणपत्र निशाणी क्र.17 वर दाखल केले आहे.

04. अर्जदार व गैरअर्जदार यांचे म्हणणे वाचले. अर्जदार व गैरअर्जदार यांनी दाखल केलेले कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार व गैरअर्जदार यांचे उत्पन्न आणि खर्चाचे विवरणपत्राचे अवलोकन केले. अर्जदारांचे विद्वान विधीज्ञ श्री. डी. पी. मापारी आणि गैरअर्जदारांचे विद्वान विधीज्ञ श्री. डी. जे. कुरेशी यांचा युक्तिवाद ऐकला.

05. अर्जदार क्र.1 हिचे असे म्हणणे आहे की, तिचे गैरअर्जदार क्र.1 सोबत दिनांक 22.05.2019 रोजी मौजे पांग्रा डोळे, ता. लोणार, जि. बुलढाणा येथे लग्न

झाले. सदर लग्न संबंधातुन अर्जदार क्र.1 हीला दोन मुली (अर्जदार क्र. 2 व 3) झाल्या आहेत.

**06.** लग्नानंतर अर्जदार हिला गैरअर्जदारांनी सुरुवातीचे 6 महीने चांगले नांदविले. गैरअर्जदार हे अर्जदार हिला सुरुवातीपासूनच तिच्या वडिलांनी लग्नात अंधान भांडी कमी दिली या कारणावरून त्रास देऊ लागले. अर्जदार हिचे गैर अर्जदार क्र.1 सोबत लग्न झाल्या नंतर काही दिवसांनी अर्जदार हिचे सासरे आणि तिच्या पतीचे भाऊ या दोन व्यक्तींचे निधन झाले. त्यामुळे गैरअर्जदार तिला ती पांढऱ्या पायाची आहे तिच्या मुळेच गैरअर्जदार क्र.1 चे वडील आणि भाऊ यांचे निधन झाले म्हणून अर्जदार हिला गैरअर्जदार त्रास देत असत. गैरअर्जदार क्र.3 ही अर्जदार क्र.1 ची जाऊ आहे. म्हणजेच गैरअर्जदार क्र.1 च्या भावाची पत्नी आहे. असे असूनही गैरअर्जदार क्र.1 चे गैर अर्जदार क्र.3 सोबत अनैतिक संबंध निर्माण झाले. अर्जदार हिने त्यावर आक्षेप घेतला असता गैरअर्जदार क्र.1 व 3 यांनी गा अर्जदार हिल मारहाण केली. गैरअर्जदार क्र.1 अर्जदार हिला असे म्हणाला की, तो गैरअर्जदार क्र.3 सोबतच राहणार आहे आणि त्याला अर्जदार क्र.1 सोबत अ राहायचे नाही. असे म्हणून त्याने अर्जदार हिल मारहाण केली आणि अर्जदार क्र.1 हिला घराबाहेर काढून टाकले.

**07.** अर्जदार हिचे पुढे असे म्हणणे आहे की, दिनांक 14.09.2023 रोजी अर्जदार हिचे तब्बेत बिघडली त्यामुळे ती गैरअर्जदार क्र.1 ला दवाखान्यात घेऊन चला असे म्हणाली. परंतु गैरअर्जदार क्र.1 ने तिला दवाखान्यात नेले नाही. उलट गैरअर्जदार याने अर्जदार हिच्याकडे रुपये 1,00,000/– ची मागणी केली आणि पैसे आणले नाही तर घरात राहायचे नाही असे म्हणून तिचे कपडे काढून तिला मारहाण केली आणि नेसत्य वस्त्रा निशी घरातून बाहेर हकलून लावले. त्यामुळे र अर्जदार हिने तिच्या आजोबा ला बोलावून घेतले. तिचे आजोबा ने गैरअर्जदार यांना समजावून सांगण्याच प्रयत्न केला. परंतु गैरअर्जदारांनी तिच्या आजोबाचा सुद्धा अपमान केला आणि त्यांना सुद्धा लोटपाट केली. अर्जदार हिला घरात घेतले नाही. त्यामुळे ना विलाजाने, माहेरी राहत आहे.

**08.** अर्जदार हिचे पुढे असे म्हणणे आहे की, त्यानंतर तिने भरोसा सेल बुलढाणा

येथे तक्रार दाखल केली. परंतु गैर अर्जदार यांनी तिला नांदायला नेले नाही. दरम्यान च्या काळात दिनांक 11.09.2020 रोजी अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये आपसनामा झाला होता. त्यामुळे ती गैरअर्जदारांकडे नांदायला गेली होती. परंतु गैरअर्जदार यांच्या गा वागण्यात काहीही फरक पडला नाही. गैरअर्जदार यांनी अर्जदार हिल मारहाण करून घरच्या बाहेर हाकलून लावले. गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला व तिच्या आई वडिलांना तुम्ही इकडे आले तर तुम्हाला जीवे मरतो आशा धमक्या दिल्या. त्यामुळे अर्जदार ही तिच्या मुलींना (अर्जदार क्र.2 व 3 यांना) घेऊन माहेरी राहत आहे. पुढे तिचे असे म्हणणे आहे की, ती जेंव्हा पासून माहेरी राहत आहे तेंव्हा पासून गैरअर्जदारांनी तिच्या तसेच तिच्या मुलींच्या (अर्जदार क्र.2 व 3 यांच्या) खाण्यापिण्याची, कपड्यालत्याची आणि दैनंदिन खर्चाची काहीही तरतूद केली नाही. अर्जदार हिची गैरअर्जदाराकडे नांदायला जावयाची इच्छा आहे. परंतु गैरअर्जदार तिला नंदवायला तयार नाही. अर्जदार हिचे पुढे असे म्हणणे आहे की, तिच्या कडे उत्पन्नाचे काहीही साधन नाही. त्यामुळे तिच्यावर आणि तिच्या मुलींवर उपासमारी ची वेळ आलेली आहे. मूल अर्ज निकाली निघण्यासाठी बऱ्याच वेळ लागणार आहे. त्यामुळे अर्जदार हिल तात्पुरती अर्थीक मदत अवश्यक आहे. अर्जदार हिला स्वतः साठी आणि तिच्या मुलींसाठी उदरनिर्वाह तसेच इतर खर्च दरमाह रुपये 15,000/- येतो. त्यामुळे गैरअर्जदारांनी तिला आणि तिच्या मुलीला एकत्रित अंतरिम पोटगी म्हणून दरमाह रुपये 15,000/- द्यावेत असे गैरअर्जदारांना आदेशीत करावे अशी तिने विनंती केली आहे.

**09.** अर्जदार हिचे पुढे असे म्हणणे आहे की, गैरअर्जदार क्र.1 याच्याकडे पाण्याची 0.66 आर. इतकी जमीन आहे. त्यापासून त्याला वर्षाला रुपये 5,00,000/- ते 7,00,000/- उत्पन्न मिळते. त्याच बरोबर गैर अर्जदार क्र.1 हा ड्रायवर म्हणून सुद्धा काम करतो. त्यामधुन त्याला दरमहा रुपये 30,000/- ते 40,000/- मिळतात. तसेच त्याच्या नावाने दोन खोल्याचे घर आहे आणि दोन रिकामे प्लॉट आहेत. एकंदरीत गैरअर्जदार क्र.1 ची अर्थीक परिस्थिति सक्षम आहे. त्यामुळे गैरअर्जदार हे अर्जदार हिने मागणी केल्या प्रमाणे सहजपणे तिला पोटगी देऊ

शकतात. प्रकरणाचा निकाल लागण्यासाठी बराच अवधि लागणार आहे. त्यामुळे तिचा अर्ज मंजूर करावा अशी तिने विनंती केली आहे.

**10.** गैरअर्जदारांनी निशाणी क्र.14 वर म्हणणे दाखल केले आहे. करुन अर्जास आक्षेप घेतला आहे. अर्जदार क्र.1 ही त्याची पत्नी आहे आणि अर्जदार क्र.2 व 3 या त्याच्या मुली आहेत या बाबी त्याला मान्य आहेत. त्याच बरोबर अर्जदार क्र.1 ही अर्जदार क्र.2 व 3 यांना घेऊन तिचे माहेरी राहत आहे हे सुद्धा त्याला मान्य आहे.

**11.** गैरअर्जदारांचे असे म्हणणे आहे की, अर्जदार ही तिचे गैरअर्जदार क्र.1 सोबत लग्न झाल्या नंतर सुरवातीचे काही दिवस चांगली नांदली. त्यानंतर छोट्या–छोट्या कारणावरून ती गैरअर्जदारांसोबत भांडण झगडा करू लागली. ती घरातील लोकांना अपमानित करीत असे. गैरअर्जदार क्र.1 ला ती म्हणत असे की, त्याला काही काम धंदा येत नाही. त्याच बरोबर ती गहरातील सर्व लोकांना उद्धट पणे बोलत असे. घरातील दैनंदिन काम व्यवस्थित करीत नसे. ती गैर अर्जदारकडे वेगळे राहुत म्हणून तगादा लावत असे. गैरअरजकडर गैरअर्जदारांचे पुढे असे म्हणणे आहे की, अर्जदार ही घरातील कोणालाही न सांगता तिचे आजोबा सोबत माहेरी निघून जात असे. तिला नांदायला बोलविले तेंव्हा ती येण्यास टाळा–टाळ करीत असे.

**12.** गैरअर्जदारांचे पुढे असे म्हणणे आहे की, अर्जदार ही गरोदर ह राहिली त्यामुळे ती बाळांतपणासाठी माहेरी गेली. तिला मुलगी झाली. मुलगी झाल्यामुळे अर्जदार हिचे आई वडील आणि आजोबा नाराज झाले. बाळांतपणानंतर तीने नांदायला ऊयएन येण्यासाठी टाळा–टाळ केली. गैरअर्जदार याचे वडील मृत्यू पावले त्यावेळी अर्जदार त्यांच्या अन्त्यविधी साठी आली. त्यावेळी तीने गैरअर्जदार क्र.1 च्या चारित्र्यावर संशय घेऊन त्याच्या सोबत भांडण केले. पोळ्याच्या दिवशी तिने गैरअर्जदार क्र.1 सोबत भांडण केले आणि तिच्या आजोबा ला बोलावून घेऊन ती माहेरी निघून गेली. जाताना तिने तिचे कपडे आणि दागिने सोबत नेले. त्यानंतर गैरअर्जदार यांनी तिला नांदायला येण्या साठी बऱ्याच वेळेस विनंती केली. परंतु ती नांदायला आली नाही. त्यानंतर तिने खोटे नाटे आरोप करून भरोसा सेल बुलढाणा येथे गैरअर्जदारांविरुद्ध खोटी तक्रार दिली. गैरर्जदार तेथे हजर हा झाले आणि त्यांनी

तिला नंदवायची इच्छा दर्शविली परंतु ती नांदायला आली नाही. ती असे म्हणाली की, तिचे आजोबा हो पर्यन्त तिला नांदायला जा असे म्हणणार नाहीत तो पर्यन्त ती नांदायला येणार नाही. ती व स्वतः बौन तिच्या मुलींना घेऊन म काहीही संयुक्तिक कारण नसतांना माहेरी राहत आहे.

**13.** गैरअर्जदार क्र.1 चे पुढे असे म्हणणे आहे की, अर्जदार हीने त्याच्या सोबत नांदायला नकार देऊन अर्जदार याला संसारिक आणि शारीरिक सुखा पासून वंचित ठेवले आहे. गैरअर्जदार हा अ गरीब आहे. त्याच्या कडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तो स्वतः हलकीचे जीवन जगत आहे. त्याच्यावर त्याच्या वृद्ध आई–वडिलांची जबाबदारी आहे. त्यामुळे तो अर्जदारांना त्यांनी मागणी केल्या प्रमाणे पोटगी देण्यास असमर्थ आहे.त्याचे पुढे असे म्हणणे आहे की, अर्जदार क्र.1 ही कपडे शिलाई चे काम करते. त्यामधून तिला चांगले उत्पन्न मिळते. ती स्वतः आणि तिच्या मुलींचा उदरनिर्वाह भागविण्यासाठी समर्थ आहे. अर्जदातील कथन खोटे आहे. अर्जदार हिला आशा प्रकारे प्रकरण दाखल करून गैरअर्जदारांना पोटगी मागण्याचा काहीही अधिकार नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

**14.** अर्जदारांचे अर्जातील कथन, गैरअर्जदारांचे म्हणणे वाचले. त्याच बरोबर पटलावर दाखल उत्पन्न आणि खर्चाचे विवरणपत्र यांचे अवलोकन केले. त्याच बरोबर पटलावर उपलब्ध कागदपत्रे आणि अर्जदारांचे विद्वान विधीज्ञ श्री. डी. पी. मापारी आणि गैरअर्जदारांचे विद्वान विधीज्ञ श्री. डि. जे. कुरेशी यांचा युक्तिवाद या आधारे जे मुद्दे उपस्थित झाले ते मुद्दे आणि त्या मुद्दयावरील निष्कर्ष आणि अशा निष्कर्षाप्रत येण्यासाठीची कारणमिमांसा पुढील प्रमाणे आहे.

## उपस्थित मुद्दे

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| 1. | अर्जदार क्र.1 हिने असे सिध्द केले आहे काय की, गैरअर्जदारांनी अर्जदार हिच्या आई | .. अंशतः |

| | | |
|---|---|---|
| | वडिलांनी लग्न मध्ये अंधान भांडी कमी दिली या कारणावरून त्याच बब्बोर तिच्या कडे रुपये 1,00,000/- मागणी करून आणि तिला मुलगी झाली म्हणून तिचा शारीरिक, मानसिक व आर्थिक छळ केला व त्याद्वारे तिचा कौटुंबिक हिंसाचार केला? | होकारार्थी. |
| 2. | अर्जदार असे सिद्ध करते काय की, गैरअर्जदार क्र.1 याने अर्जदार हिचे तसेच अर्जदार क्र.2 व 2 यांच्या उपजीविकेची काहीही तरतूद केली नाही आणि अर्जदार क्र.1 हीच्याकडे तिचा स्वतःचा आणि अर्जदार क्र.2 व 3 यांचा उदरनिर्वाह भागविण्यासाठी कोणतेही साधन नाही? | .. होय. |
| 3. | अर्जदार तिने मागणी केल्याप्रमाणे तिच्या स्वतःसाठी आणि अर्जदार क्र.2 व 3 साठी गैरअर्जदारांकडून एकत्रित रित्या अंतरिम पोटगी म्हणून रुपये 15000/- मिळणेसाठी पात्र आहे काय? | .. अंतिम आदेशा प्रमाणे. |
| 4. | अर्जदार तिच्या स्वतः साठी आणि अर्जदार क्र.2 व 3 साठी अंतरिम पोटगी मिळणेसाठी पात्र आहे काय? असल्यास किती? | .. अंतिम आदेशा प्रमाणे. |
| 5. | अंतिम आदेश काय? | .. अर्जदारांचा अर्ज अंशतः मंजूर |

## विचाराधीन मुद्दे

**मान्य बाबी –**

**15.** अर्जदार क्र.1 ही गैरअर्जदार क्र.1 ची पत्नी आहे आणि अर्जदार क्र.2 व 3 या त्यांच्या मुली आहेत. त्याच बरोबर अर्जदार क्र.1 ही तिच्या मुलींना (अर्जदार क्र.2 व 3 यांना) घेऊन तिच्या माहेरी राहते हे सुद्धा त्याला मान्य आहे.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक 1 ते 4 साठी**

**16.** मुद्दा क्र.1 ते 4 एकमेकांशी निगडीत आहेत. त्यामुळे पुराव्याची तसेच कारणमीमांसेची पुनरावृत्ति टाळण्यासाठी सदर मुद्याबाबद एकत्रित चर्चा केली आहे.

**17.** अर्जदार क्र.1 हिने या अर्जाद्वारे अंतरिम पोटगीची मागणी केली आहे. त्यामुळे अर्जाचे स्वरूप पाहता आणि अर्जदार क्र.1 हीची मागणी विचारात घेता, गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.1 हिचा कौंटुंबिक छळ केला काय आणि ती पोटगी मिळविणेसाठी पात्र आहे काय हे अगदी प्राथमिक स्वरूपाच्या पुराव्या आधारे ठरविणे गरजेचे आहे.

**18.** अर्जदार क्र.1 ही गैरअर्जदार क्र.1 ची पत्नी आहे आणि अर्जदार क्र.2 व 2 या त्याच्या मुली आहेत. अर्जदार क्र.1 ही तिच्या मुलींना घेऊन माहेरी राहत आहे. ही बाब गैरअर्जदारांना मान्य आहे. त्यामुळे, निश्चितच काही तरी कारण असेल, ज्यामुळे ती माहेरी राहत आहे. प्राथमिक निष्कर्ष हे प्राथमिक पुराव्याआधारे काढले असता अर्जदार मुलींना घेऊन माहेरी राहत आहे त्यासाठी निश्चितच काही कारण आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे मुद्दा क्र.1 चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदविले आहे. गैरअर्जदार क्र.1 हा अर्जदार क्र.1 हिचा पती आणि अर्जदार क्र.2 व 2 यांचा पिता आहे. त्यामुळे, त्यांच्या दैनंदिन खर्चासाठी तरतूद करणे ही त्याची कायदेशीर जबाबदारी आहे.

**19.** मूळ अर्ज निकाली निघण्यासाठी बराच कालावधी लागणार आहे. अर्जदार हिने

तिचे उत्पन्न आणि खर्चाचे विवरणपत्र निशाणी क्र.15 वर दाखल केले आहे. त्याद्वारे हे प्रथम दर्शनी हे सिद्ध होते की, अर्जदार ही स्वतःची आणि तिच्या मुलीची उपजीविका भागविण्यासाठी सक्षम नाही. गैरअर्जदार क्र.1 हा अर्जदार क्र.1 हिचा पती आहे आणि अर्जदार क्र.2 व 3 यांचा पिता आहे. त्यामुळे त्यांचे संगोपन आणि पालनपोषण करण्याची त्याची जबाबदारी आहे. गैरअर्जदार हा विवाहित पुरुष आहे त्याच बरोबर तो तरुण आहे. त्यामुळे पत्नी आणि मुलांचा सांभाळ आणि संगोपन करण्याची त्याची कायदेशीर आणि नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे मुद्दा क्र.1 चे उत्तर अंशतः होकारार्थी व 2 चे उत्तर होकारार्थी आणि मुद्दा क्र.3 व 4 चे उत्तर येणे प्रमाणे नोंदविले आहे.

**20.** अर्जदारांनी या अर्जाद्वारे अर्जदार क्र.1 ते 3 यांच्या उदरनिर्वाहसाठी व इतर खर्चा साठी एकत्रितरित्या दरमाह रुपये 15,000/- अंतरिम पोटगीची मागणी केली आहे. अर्जदार व गैरअर्जदारांचे राहण्याचे ठिकाण, तेथील सामाजिक संरचना, त्यांच्या गरजा, महागाई, वस्तूंचे दर, इत्यादि बाबींचा विचार करता अर्जदार क्र.1 ते 3 यांना दैनंदिन गरजेसाठी, उपजीविकेसाठी, त्याच वब बरोबर अर्जदार क्र.2 व 3 यांच्या शिक्षनासाठी व इतर खर्चा साठी दरमाह अंदाजे रुपये 7,000/- ते 8,000/- खर्च होत असेल असे निष्कर्ष निघतात.

**<u>मुद्दा क्र.5 साठी</u>**

**21.** गैरअर्जदार क्र.1 हा अर्जदार क्र.1 हिचा पती आहे आणि अर्जदार क्र.2 चा पिता आहे. त्यामुळे त्याची ही जबाबदारी आहे की, त्याने त्यांच्या पालन पोषण आणि संगोपन या साठी लागणार खर्च द्यावा. गैरअर्जदार क्र.2 ते 5 वर ती जबाबदारी टाकता येणार नाही. अर्जदार हिने पटलावर भूमापन क्रमांक व उपविभाग 270 मौजे सावरगाव वायाळ येथील जमिनीचा 7/12 उतारा दाखल केलेला आहे. त्यावरून असे निदर्शनास येते की, गैरअर्जदार याच्या नवे तेथे एकूण 0.66.00 इतकी जमीन

आहे. त्यामुळे त्याच्या कडे एक चांगले उत्पन्नाचे साधन आहे.

**22.** प्रस्तुतचा अर्ज हा अंतरिम पोटगी मिळविणेसाठी दाखल केलेला आहे. हा अर्ज निकाली काढण्यासाठी निव्वळ प्रथम दर्शनी पुराव्याचा आधार घ्यावा लागतो. त्यामुळे, अर्जाचे स्वरूप आणि मुद्दा क्र.1 ते 4 यांचे निष्कर्षाप्रत येण्यासाठीची कारण मीमांसा विचारात घेऊन मुद्दा क्र.5 च्या उत्तरार्थ पुढील आदेश पारित केले आहेत.

## आदेश

| | |
|---|---|
| (1) | अर्जदारांचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |
| (2) | गैरअर्जदार क्र.1 ने अर्जदार क्र. 01 हिला दरमहा रु.3500/- (रुपये तीन हजार पाचशे) आणि अर्जदार क्र. 02 ला रु.2200/- (रुपये दोन हजार दोनशे) आणि अर्जदार क्र. 03 ला रु.2200/- (रुपये दोन हजार दोनशे) अर्ज दाखल तारखेपासुन द्यावेत. |
| (3) | अर्जदार क्र.1 हिला सदर आदेशाची प्रत विनामूल्य देण्यात यावी. |
| (4) | गैरअर्जदार क्र.1 ते 4 व 6 यांना असे निर्देश देण्यात येतात की, त्यांनी अर्जदार यांच्या प्रती कोणत्याही प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार करू नये. |
| (5) | आदेशाची प्रत संबंधित पोलिस स्टेशन आणि संरक्षण अधिकारी यांना पाठविण्यात यावी. |
| (खुल्या न्यायालयात अधिघोषीत) | |

दिनांक.28.04.2026

स्वा/-
(रमाकांत भा. हनवते)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, लोणार.